नि.फौ.ख.क्रं.७८/२०२३
सरकार वि. दिनेश वगैरे
नि.क्र. २४

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ (घटनास्थळ पंच व साक्षीदार) यांची जबानी.</u>

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | यादवराव महादेव जिभकाटे, |
| वय सुमारे | : | ५७ वर्ष, व्यवसाय–शेती, |
| निवासस्थान | : | भेंडाळा, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

<u>सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–

१. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी मला लेखी सुचनापत्र दिले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला नव्हता. पोलीसांनी मला सही मागितली होती. आता मला सुचनापत्र आणि घटनास्थळ दाखवण्यात आला. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर मला माहित नाही.

२. घटना सुमारे चार ते पाच वर्षाअगोदर घडली होती. घटनेच्यावेळी यादव मेंढे यांची पत्नी आणि मनीराम मेंढे, दिनेश मेंढे यांच्यात भांडण झाले होते. भांडण झाल्यावर यादव मेंढे यांची पत्नी बेशुध्द पडली होती.

**सरतपास पुर्ण.**

<u>साक्षदार सरकार पक्षाला सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षदाराची उलट तपासणीची परवाणगी देण्यात आली.</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/०१/२०२३ रोजी पोलीसांनी मला सुचनापत्र देऊन घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा वाचुन दाखवला होता.

४. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४/०१/२०२३ रोजी सकाळी ०७:०० ते ०७:३० वाजेच्या दरम्यान मी माझया घरासमोर रोडवर उभा असताना यादव मेंढे व मणीराम मेंढे यांच्या घराकडून जोरजोरात भांडणाचा आवाज ऐकू येत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांच्या घराजवळ जाऊन पाहिले असता मला तिथे लोकांची गर्दी दिसली. हे म्हणणे खरे नाही की, वडीलोपार्जीत रोडवर यादव मेंढे व त्यांची

पत्नी हिला दिनेश मेंढे, सिमा मेंढे आणि मणीराम मेंढे शिवीगाळ करून ढकलढुकल करताना मला दिसले. हे म्हणणे खरे आहे की, यादव मेंढे यांची पत्नी बेहोश पडल्यासारखी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, भांडण मी सोडवले होते. हे म्हणणे खरे आहे की, यादव मेंढे याने फोरव्हीलर बोलवून त्याच्या पत्नीला दवाखान्यात नेले होते. हे मला माहित नाही की, वडीलोपार्जीत रोडवर पावसाचे पाणी साचल्यामुळे मणीराम मेंढे शिवीगाळ करत होते. हे मला माहित नाही की, वृषाली मेंढे ही मणीराम मेंढे यांना असे म्हणाली की, "कशाला शिवीगाळ करता, असे म्हणुन हटकले". हे मला माहित नाही की, दिनेश मेंढे याने वृषाली मेंढे हिला शिवीगाळ करून तिच्या डोक्यावर काठीने मारुन तिचे केस पकडून तिला चिखलात ढकलत नेले. हे म्हणणे खरे आहे की, यादव मेंढे आणि आरोपींमध्ये भांडण झाले होते.

**उलट तपास आरोपींतर्फे वकील के. एम. जिभकाटे साहेब यांच्यामार्फत –**

**५.** हे म्हणणे खरे आहे की, सुचनापत्र आणि घटनास्थळ पंचनाम्यावर पोलीसांनी माझ्या सहया एकाचवेळी घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा आधीच तयार करून ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा वाचुन दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सही करायला सांगितली म्हणुन मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, भांडण कोणामध्ये झाले आणि कोणत्या कारणावरुन झाले हे मला माहित नाही व ते मी प्रत्यक्ष बघितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, भांडणाबाबत मला नंतर माहिती झाले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे बयान माझ्या म्हणण्यानुसार नोंदवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
१४/११/२०२५

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
१४/११/२०२५

नि.फौ.ख.क्रं.७८/२०२३
सरकार वि. दिनेश वगैरे
नि.क्र. २५

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | वृषाली यादव मेंढे |
| वय सुमारे | : | ४५ वर्ष, व्यवसाय– शेती |
| निवासस्थान | : | भेंडाळा, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

**१.** घटना दिनांक ०४/०१/२०२३ रोजी घडली होती. घटना सुमारे सकाळी ०७:०० वाजेच्या दरम्यान माझ्या घरी घडली होती. घटनेच्यावेळी मणीराम मेंढे जोरजोरात शिवीगाळ करत होते. त्यानंतर मी मणीराम मेंढे यांना असे म्हणाले की,''कशाला शिवीगाळ करता''. त्यावेळी दिनेश मेंढे घरातून एक लाकडी काठी घेऊन धावत आला आणि त्याने माझ्या डोक्यावर डाव्या बाजुला काठीने मारले. त्यानंतर मी ओरडले. माझा आवाज ऐकुन माझे पती यादव मेंढे घटनास्थळी धावत आले. दिनेश मेंढे याने माझे केस पकडून मला अंगणातून रोडवर ओढत नेले होते. तिन्ही आरोपींनी माझ्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर मी बेशुध्द झाली. त्यानंतर काय घडले याबाबत मला माहिती नाही. ज्या काठीने मला मारले होते ती मला दाखवल्यास मी ती ओळखू शकते. आता मला **आर्टिकल अ** वरील बासाची लाकडी काठी दाखवण्यात आली. ती तीच आहे. आरोपींना मी ओळखते. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास थोडयावेळाकरीता तहकुब.</u>**

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे.,(न्या.क्र. २)पवनी.
१४/११/२०२५

**<u>मध्यान्हाची वेळ संपली. शपथेवर उलट तपास आरोपींतर्फे वकील के. एम. जिभकाटे साहेब यांच्यामार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि आरोपींचे घरे जवळजवळ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी जनावरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या बाजुला गुरांचा गोठा आहे. माझे दोन घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या बाजुला मी आमचे जनावरे बांधत असते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या जनावरांचे मलमूत्र आरोपींच्या घराच्या अंगणात वाहुन येत असते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दिनेश याला दोन लहान मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांच्या मलमुत्रामुळे आरोपींच्या अंगणात जंतू तयार झाले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, आरोपींच्या घराच्या अंगणात मलमूत्र वाहुन जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांच्या मलमुत्राच्या त्रासामुळे आरोपींनी त्यांच्या घराच्या अंगणात मुरूम व माती टाकली होती. हे म्हणणे खरे आहे की, मुरूम टाकल्यानंतर आरोपी आणि आमच्यात वाद झाला होता व तेव्हापासूनच आमची बोलचाल बंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या अंगणातील मुरूम माझ्या पतीने जेसीबीच्या सहाय्याने काढला होता. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, कोर्टाच्या आदेशानुसार तो मुरूम काढण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, पावसाचे पाणी माझ्या अंगणातून ग्रामपंचायत नालीत जाते. हे म्हणणे खरे नाही की, मुरूम काढल्यामुळे आरोपींचे घराचे आंगण खोल झाले आणि त्यामुळे पावसाचे पाणी त्यांच्या अंगणातून रस्त्यावर निघत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दिनेश माझ्या घरासमोरील नालीला पाणी वाहुन जाण्यासाठी छिद्र पाडत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याला छिद्र पाडताना बघून मी आणि माझे पतीने त्याला अटकाव केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनेशच्या अंगावर धावुन जाताना माझा पाय घसरून मी सिमेंटच्या नालीवर आदळले आणि त्यामुळे माझ्या डोक्याला इजा झाली. हे म्हणणे खरे नाही की, सुरूवातीपासुनच पावसाचे पाणी दिनेश छिद्र पाडत असलेल्या जागेवरुन जाते. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, दिनेश नालीला छिद्र पाडत नव्हता.

३. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगितले होते की, "माझ्या डोक्यावर **डाव्या बाजुला** काठीने मारले", "माझ्या पतीला **लाथाबुक्यांनी** मारहाण केली". आता मला माझे बयान वाचुन दाखवण्यात आले. उपरोक्त बाबी (डाव्या बाजुला आणि लाथाबुक्यांनी) माझ्या बयानात नमूद नाहीत. पोलीसांनी माझ्या बयानात त्या का लिहील्या नाहीत याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल अ वरील काठीने मला मारहाण करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल अ वरील काठी माझ्या पतीने

पोलीसांना दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने आरोपींविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना फसवण्याकरीता मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
१४/११/२०२५

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
१४/११/२०२५